# जालना शहर महानगरपालिका, जालना

प्रशासकीय इमारत, रेल्वे स्टेशन रोड, जुना जालना- 431203 कार्यालय संपर्क क्र. (02482)-230350
Email ID- comcjalna@gmail.com Website-jalnamahaulb.maharashtra.gov.in


जा.क्र/मनपा/स्व.वि./2026/ 83 दिनांक:-07 /05/2026

## ई-निविदा सुचना क्र.01

जालना शहर महानगरपालिकामार्फत खालील नमुद कामासाठी ई-निविदा/दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सर्व निविदा धारकांनी आपली ई-निविदा/दरपत्रके www.mahatenders.gov.inया संकेतस्थळावर दिनांक 08/05/2026 ते दिनांक 22 /05/2026 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत भरण्यात यावे. सदरील ई-निविदा दिनांक 25 /05/2025 रोजी (शक्य झाल्यास) दुपारी ठिक 3.00 वा. महानगरपालिका कार्यालयात निविदा समिती व ठेकेदार त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

| अ. क्र | कामाचे नांव | अंदाजित खर्च रक्कम रु. | युनिट | दर | काम करण्याचा कालावधी | इसारा रक्कम 1% | सुरक्षित ठेव रक्कम (2%) | निविदा फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 6 | 8 | 9 | 10 | 11 |
| 1 | जालना शहरातील घरगुती तसेच हॉटेल, दुकाने इत्यादी आस्थापनांचा कचरा गोळा करणे त्यांचे ओला व सुका असे विलगीकरण करणे, नालीतील गाळ काढुन कचरा संकलन केंद्रावर टाकणे व कचरा संकलन केद्रावरील कचरा वाहून कॉम्पॅक्टर, टिप्प इत्यादी मोठ्या गाडयाने वाहुन घनकचरा प्रक्रिया केद्र सामनगाव येथे नेवून टाकणे, स्वच्छता विषयाबाबत जनजागृती करणे. (इंधन, ड्रायव्हर, गाड्याची देखभाल व दुरुस्तीसह) | 14,74,35,074/- सन 2026-27 | टन | 2885 प्रति टन प्रमाणे | ~~12 महिने~~ 10 महिने | 14,74,350/- | 29,48,701/- | 25,000/- |
| | | | | | | | | अंदाजित रक्कम रु. 14,74,35,074/- |

- **निविदेतील सर्वसाधारण अटी-शर्ती :**

1. दिनांक 14/ 05 /2026 रोजी प्रि-बिड मिटींग (Pre-Bid Meeting) राहील.
2. प्रि-बिड मिटींग नंतर आपली कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.
3. अभीकर्त्यांने निविदा ई पद्धतीने सादर कराव्यात.
4. सदर कामाकरिता जॉईंट व्हेंचर निविदाकार ग्राह्य धरले जाणार नाहीत.
5. निविदा सादर करताना तांत्रिक लिफाफा क्रमांक एक व लिफाफा क्रमांक दोन स्वतंत्रपणे संकेतस्थळावर भरणे आवश्यक राहील. निविदा अटी शर्तीनुसार इसारा रक्कम व निविदा फॉर्म भरणा केलेल्या चलनाची प्रत व निविदेत दर्शविल्याप्रमाणे ई-पेमेंट पद्धतीने भरावी
6. निविदा भरताना अनामत रक्कम ही निविदामध्ये नमूद केल्याप्रमाणे भरणे आवश्यक राहील. इसारा अनामत रक्कम न भरलेली निविदा स्वीकारण्यात येणार नाही. तसेच इसारा अनामत रकमेवर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही. तसेच निविदा अर्जाची किमत ना परतावा असेल.
7. निविदा ई-टेंडरिंग पद्धतीने सादर करावे लागतील. निविदेसाठीची अर्हता व कागदपत्रे क्रमवार अपलोड करून सादर करावे लागतील. सदर कागदपत्रांच्या मूळ प्रति व एक सत्यप्रत निविदा छाननीचे वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

8. Bidder / त्याच्या कुटुंबातील सदस्यांना एकाच निविदेद्वारे भाग घेता येईल. इतर निविदा अर्जाशी त्याचा संबंध आढळून आल्यास अशा अभिकर्त्यास अपात्र करण्यात येईल.

9. शहरातील वॉर्ड निहाय दैनंदिन घराघरातून निर्माण होणारा ओला व सुका विलगीकृत कचरा चार चाकी घंटागाडीची वाहतूक कलेक्शन सेंटर पर्यंत करणे व सदर ठिकाणी ओला व सुका कचरा वेगवेगळ्या हायड्रोलिक रिफ्युज कॉम्पॅक्टर पासून ते घनकचरा प्रकल्प सामानगाव पर्यंत न्यावयाचे असल्याने सदरचे अंतर विचारत घेऊनच दर सादर करावेत.

10. मंजूर अभिकर्त्याने एकूण निविदा वार्षिक किमतीच्या दोन टक्के सुरक्षा अनामत म्हणून भरावी लागेल व त्यानंतरच करारनामा करण्यात येईल. सुरक्षा अनामत रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

11. सुरक्षा अनामत रक्कम भरल्याशिवाय कार्यादेश दिला जाणार नाही. विहित मुदतीत सुरक्षा अनामत रक्कम न भरल्यास निविदा रद्द करून इसारा रक्कम जप्त केली जाईल.

12. आलेल्या सर्व अथवा कोणतीही निविदा अंशतः किंवा पूर्णतः स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त जालना महानगरपालिका यांचा राहील.

13. अपात्र ई-निविदा धारकांची EMD महाटेंडर पोर्टलवरुन स्वचलीत पध्दतीने परत होईल.

14. शहरातील अंदाजे 500 KM नाल्याची साफसफाई करण्यासाठी दैनंदिन स्तरावर किमान 50 KM इतक्या नाल्या किमान 100 (100 पैकी 50 महानगरपालिकेचे असतील) कामागारांकडून स्वच्छ करुन घेण्यासाठी कंत्राटदाराच्या स्तरावर नियोजन होऊन कार्यादेश मिळाल्यापासून 15 दिवसाच्या आत सदर नियोजन महानगरपालिकेला सादर करणे कंत्राटदारस बंधनकारक राहील.

15. सदर साफसफाई किमान 30 सेंटीमिटर इतक्या खोलीपर्यत आणि 0.6 मीटर इतक्या रूंदी पर्यत करणे आवश्यक आहे.

16. सांस्कृतीक कार्यक्रम सण, उत्सव आणि आपत्तकालीन स्थीतीमध्ये संबधीत ठिकाणची स्वच्छता 6 तासांच्या आत करणे बंधनकारक राहील.

- **सर्वसाधारण अटी-शर्ती :**

1. अभिकर्त्यामार्फत पुरवठा करण्यात आलेले कामगार व मनपा कर्मचारी यांचे झाडलोट मधून निघालेल्या कचरा तसेच गटारीतील गाळ मक्तेदारास स्वतंत्ररित्या संकलन करून वाहतूक करावी लागेल.

2. संपूर्ण प्रभागातील घराघरातून गोळा होणारा ओला व सुका कचरा वेगवेगळ्या संकलन करण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहील. काही ठिकाणी कामात अपूर्णता असल्याचे मनपा अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आल्यास तेथे वाहने वाढविणे अभिकर्त्या स्वखर्चाने पूर्तता करणे बंधनकारक राहील.

3. शहरातील नागरिकांना ओला व सुकावेल अधिकृत कचरा घरगुती घातक कचरा घंटागाडीत देणे बाबत शहरातील नागरिकांमध्ये प्रबोधन करण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहील.

4. अभीकर्त्यामार्फत अत्यंत बारीक गल्ल्यांमध्ये हात गाडी अथवा लहान घंटा गाड्यांनी ओला व सुका कचरा गोळा करावा लागेल ज्या भागांमध्ये वाहने जात नाहीत अशा भागांमध्ये अभिकरतामार्फत कचरा वेचकांची नेमणूक करून घराघरातील ओला व सुका विलगीकृत करून हातगाडी द्वारे संकलित करून निश्चित ठिकाणी वाहतूक व हस्तांतरण स्थानक येथे करणे बंधनकारक राहील.

5. अभीकर्त्याला शहरातील कचरा वाहतूक करताना कचरा अच्छादन करून वाहतूक करणे बंधनकारक राहील.

6. ऑनलाइन दूरध्वनी लेखी स्वरूपात स्वच्छता विभागीते प्राप्त झालेल्या तक्रारींचा निपटारा बारा तासात करावा लागेल त्यासाठी शहरातील नागरिकांना स्वतंत्र टोल फ्री क्रमांक अभिकर्त्यांनी उपलब्ध करून द्यावा लागेल. तसेच सदर तक्रार निवारण करणारी व्यक्ती मनपा कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये बसवून ठेवावी लागेल.

7. अभीकर्त्याला घनकचरा अधिनियम 2026 व त्या अंतर्गत येणा-या सर्व नियमांचे व घनकचरा निगडीत ईतर नियमांच्यानुसार घराघरातील गोळा होणारा ओला व सुका कचरा तसेच घरगुती घातक कचरा वेगवेगळ्या देण्याकरिता माहिती पत्रके तयार करून नागरिकांना द्यावे लागेल.

8. मनपाच्या दैनंदिन साफसफाई तसेच अनुषंगिक कामांसाठी कामगारांची आवश्यकता भासल्यास अभिकर्त्याला मंजूर दरात कामगारांचा पुरवठा करावा लागेल सदर कामगारांच्या संख्येनुसार किमान वेतन दरानुसार कामगारांना वेतन अभिकर्त्यास करावे लागेल.

9. अभीकर्त्याला प्रत्येक विभागात महानगरपालिकेने निर्धारित केलेल्या प्रभागात घंटागाडी थांबण्याचे ठिकाण वेळ स्वतःच्या खर्चाने पेंटिंग करून फलक लावणे बंधनकारक आहे.

10. एकाग्र सत्रात दैनंदिन घराघरातून निर्माण होणारा ओला व सुका कचरा विलगीकृत कचरा चार चाकी हायड्रोलिक घंटागाडीचे किमान तीन फेऱ्या करून निर्धारित केलेल्या मार्गावरील संपूर्ण कचरा संकलित करून वाहतूक कलेक्शन सेंटर पर्यंत वाहतूक करणे व सदर ठिकाणी ओला व सुका कचरा वेगवेगळया हायड्रोलिक रिफ्युज कॉम्पॅक्टर द्वारे सामनगाव येथील घनकचरा प्रकल्पापर्यंत पाठवणे याची जबाबदारी अभिकर्त्यावर राहील. यासाठी टिप्पर तसेच रिफ्युज कॉम्पॅक्टरच्या आवश्यक तेवढ्या ट्रिप करण्याची जबाबदारी कंत्राट दाराची असेल.

11. शहरातील उघड्यावरील कचरा उदाहरणार्थ भाजी मार्केट व्यापारी संकुल हे बगीचे बाजारपेठ इत्यादी ठिकाणांचा कचरा संकलनाची जबाबदारी अभिकर्त्याची राहील याकरिता आवश्यक ज्यादा फेरी करावे लागतील यासाठी वेगळा मोबदला दिला जाणार नाही.

12. ज्या दिवशी वाहन चालक व सफाई कामगार उपलब्ध न झाल्यास त्या दिवशी पर्यायी वाहन चालक व कामगारांचे व्यवस्था अभिकरत्याला करावी लागेल अन्यथा वाहन बंद राहील व त्या दिवसाचे वेतन अदा केले जाणार नाही त्या दिवसाकरिता घनकचरा संकलन व वाहतूक करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पर्यायी वाहनांचे वाहन चालक कामगारांचे वेतन अभिकर्त्याकडून वसूल करण्यात येईल.

13. घरोघरी घनकचरा संकलनाकरिता वाहने व मनुष्य वर्षातील 365 दिवस आवश्यकतेप्रमाणे उपलब्ध करून देणे अभिकर्त्यावर बंधनकारक राहील.

14. शहरातील मार्केट किंवा बाजार परिसरातील रात्रीच्या वेळी दिवसाप्रमाणेच कचरा संकलनाचे काम आवश्यकतेनुसार करावे लागेल रात्रपाळीने कचरा संकलन करण्याची जबाबदारी अभिकर्ता यांच्यावर राहील.

15. धार्मिक उत्सवाच्या वेळेस निर्माण होणारे निर्माल्या संकलन इत्यादीसाठी स्वतंत्र वाहनाचे व्यवस्था करणे अभिकर्त्यास बंधनकारक राहील.

16. घंटागाडीत दवाखान्यातील हॉस्पिटल लॅब इत्यादी कोणत्याही प्रकारचा कचरा बायोमेडिकल वेस्ट गोळा करता येणार नाही.

17. शहरातील स्वतंत्र हॉटेल्स मंगल कार्यालय व मटन मार्केट चिकन सेंटर येथील कचरा संकलनासाठी स्वतंत्र वाहनांचे व्यवस्था करावी लागेल.

18. अभिकर्त्याने घनकचरा प्रक्रिया प्रकल्प तसेच ट्रान्सफर कलेक्शन सेंटर वरील वजन काट्यावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे व त्याचे थेट प्रक्षेपण मनपा घनकचरा व्यवस्थापन कक्षाशी संलग्न करणे मक्तेदारास बंधनकारक राहील.

- **बायोमेट्रिक हजेरी :**

1. कामगारांच्या हजेरीसाठी बायोमेट्रिक किंवा सेल्फी यंत्रणा अभिकर्ताला स्वखर्चाने बसविणे बंधनकारक राहील. सदरची बायोमेट्रिक किंवा सेल्फी यंत्रणा महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत प्रमाणित करून घेणे बंधनकारक राहील. सदर मशीनची तपासणी घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून वेळोवेळी करण्यात येईल.
2. अभिकर्त्यामार्फत वॉर्ड निहाय पुरवण्यात येणाऱ्या कामगारांची दैनंदिन हजेरी संबंधित हजेरी शेड वर बायोमेट्रिक किंवा सेल्फी पद्धतीने दिवसातून दोन वेळा ( काम सुरू होण्याआधी आणि काम संपल्यावर ) घेणे बंधनकारक राहील.

- **आयसीटी based अंमलबजावणी :**

1. अभीकर्त्याने आपल्या कामगारामार्फत आस्थापना, घरे, दुकाने, कार्यालय इत्यादी ठिकाणी प्राप्त होणाऱ्या ओला व सुका कचरा संकलनासाठी आयटीआय प्रायव्हेट लिमिटेड मुंबई यांनी आयसीटी based मॉनिटरींग सिस्टीम अंतर्गत लावण्यात आलेल्या क्यूआर कोड स्कॅनिंग करणे बंधनकारक राहील.

**वाहनांविषयी:**

1. नियुक्त अभिकर्त्यास महानगरपालिकेद्वारे पुरविण्यात येणाऱ्या वाहनांचा तपशील खालील प्रमाणे असून वाहनावरील कामगार वाहन चालक इंधन खर्च व देखभाल दुरुस्तीसह अनुषंगिक खर्च करण्याची जबाबदारी मक्तदाराचे राहील. या व्यतिरिक्त लागणारी वाहने पुरवठा करण्याची जबाबदारी मक्तेदाराची राहील.

2. अभीकर्त्यास मनपातर्फे घनकचरा वाहतुकीसाठी सद्यस्थितीत उपलब्ध असलेले तसेच भविष्यात मनपाकडे प्राप्त होणारे वाहने, घंटागाडी, रिफ्युज कॉम्पॅक्टर, टिप्पर, डंपर, स्कीप लोडर इत्यादी पुरविण्यात येणार असून मग त्याचा कालावधी संपल्यानंतर वाहने चालू व सुस्थितीत मनपास परत करणे बंधनकारक राहील.
3. मनपा तर्फे पुरवण्यात येणाऱ्या चार चाकी घंटागाड्यांमध्ये शास्त्रोक्त पद्धतीने ओला व सुका कचरा संकलन करण्यासाठी स्वतंत्र कप्पे आहेत त्यामध्ये ओला व सुखा घनकचरा विलगिकृत गोळा करून कलेक्शन सेंटर पर्यंत पोहोच करणे व त्या ठिकाणी सुका कचरा व ओला कचरा वेगवेगळ्या रिफ्युज कॉम्पॅक्टर मध्ये लोड करून प्रायमरी कलेक्शन सेंटर पासून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प सामनगाव पर्यंत वाहतूक करण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहील.
4. माननीय आयुक्त यांचे पूर्वपरवानगीशिवाय निविदेतील नमूद वाहन अभिकर्त्याकडून सादर केलेली व आयुक्तांनी मान्यता दिलेली वाहनांच्या व्यतिरिक्त अभिकर्त्यास परस्पर कोणतीही वाहने भाड्याने लावतात येणार नाहीत.
5. घनकचरा संकलन व वाहतुकीसाठी आवश्यक वाहनांची उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून विहित मुदतीत वाहनांचे योग्य त प्रमाणपत्र वाहन विमा पीयूसी बीड गव्हर्मेंट सर्टिफिकेट इत्यादी स्वखर्चाने काढण्याची व नूतनीकरण करण्याची जबाबदारी अभिकर्ता यांची राहील तसेच मनपातर्फे पुरवण्यात येणाऱ्या वाहनांचा घसारा अभिकर्ता यांचे देयकातून कपात करण्यात येईल.
6. शहरातील कचरा संकलन व वाहतूक करण्यासाठी मनपा मार्फत पुरविण्यात येणारी वाहने व अभिकर्त्याची वाहने इत्यादी वाहनांवर लागणारे मनुष्यबळ इंधन देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहील ही बाब विचारात घेऊन अभिकर्त्यांनी निविदा दर सादर करावेत.
7. मनपा कंत्राटदारास वाहनांच्या पार्किंग व्यवस्था साठी जागा उपलब्ध करून देण्यात येईल मात्र सदर ठिकाणी त्यांचेवर देखरेखी साठी सुरक्षाच्या दृष्टीने व्यवस्था अभीकर्त्याच्या स्वखर्चाने करावी लागेल.
8. अभीकर्त्यांनी नेमणूक केलेल्या वाहन चालकांकडे मुदतीचा अधिकृत परवाना असणे आवश्यक आहे.
9. शहरातील शंभर टक्के कचरा उचलणे अभिकर्त्यावर बंधनकारक राहील कचरा निर्मिती शहरातील लोकसंख्येवर अवलंबून असते त्यामुळे विहित केलेल्या मदतीत लोकसंख्येच्या प्रमाणात वाढणारी घरे मनपाने निर्देश देईल त्याप्रमाणे मनुष्यबळ, वाहन व्यवस्था अभिकर्त्यास करावे लागेल.
10. शहरातील रस्त्यावरील घनकचरा निर्मिती जास्त झाल्यास आवश्यकतेनुसार संकलन व वाहतूक करणे करिता पर्यायी जास्तीचे वाहने उपलब्ध करण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहील.
11. घंटागाडी, रिफ्युज कॉम्पॅक्टर व इतर कचरा संकलन वापरण्यात येणारी वाहने नियमित आतून व बाहेरून स्वच्छ करून त्यांचे नियमितपणे दुर्गंधीनाशक किंवा कीटकनाशकांची फवारणी स्वखर्चाने करण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहील व त्याचे नियमित वेळापत्रक अभिकर्त्यास देण्यात येईल.
12. वाहनांना आवश्यकतेनुसार रंग देऊन वेगवेगळ्या प्रकारे स्वच्छतेबाबतचे संदेश लिहिणे बंधनकारक राहील.
13. ओला व सुका कचरा संकलन करणारे वाहनावर जनजागृती पर संदेश स्लोगन मनपाकडून दिल्या जाणाऱ्या सूचना प्रसारित करण्यासाठी प्रत्येक वाहनावर ॲम्प्लिफायर व स्पीकर स्वखर्चाने लावणे आवश्यक राहील.
14. वाहनांच्या संख्येनुसार अपेक्षित दैनंदिन वाहनचालक व कामगार पुरवठा करण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहील.
15. घरगुती घातक कचरा स्वतंत्रपणे संकलनासाठी लाल रंगाची बॅग घंटागाडीवर लावणी अभिकर्त्यास बंधनकारक राहील.
16. अभिकर्त्यास दैनंदिन कचरा संकलन करणा-या वाहनांवर (सर्व महानगरपालिकेच्या मालकीच्या व खाजगी वाहनांवर जसे की, घंटागाडी, रिफ्युज कॉम्पॅक्टर, टिप्पर, डंपर, स्कीप लोडर) GPS यंत्रणा बसविणे बंधनकारक राहील.

- **वाहनावरील कचऱ्याचे वजन :**

1. अभीकर्त्यामार्फत घंटागाडी द्वारे तसेच ट्रॅक्टर द्वारे प्रायमरी कलेक्शन सेंटर येथे आणलेला कचरा प्रायमरी कलेक्शन सेंटरवर तसेच सदर ठिकाणाहून सामनगाव येथे नेणारा कचरा सामनगाव येथे मोजण्याचे जबाबदारी अभिकर्त्यावर राहील. यासाठी मनपाद्वारे वजन काटा

उपलब्ध करून दिला जाईल. काही कारणास्तव हा काटा बंद पडल्यास तो दुरुस्त होईपर्यंत मागील तीन दिवसांचे सरासरी वजन बिल करताना ग्राह्य धरण्यात येईल.

2. अभिकर्त्यांने दैनंदिन ओला व सुका या विलगीकृत कचऱ्याच्या वजनाची नोंद लॉक बुक ठेवणे कर्मप्राप्त असून त्यावर संबंधित पर्यवेक्षक किंवा अन्य सक्षम अधिकाऱ्यांचे स्वाक्षरी घेणे बंधनकारक राहील.

- **कामाची वेळ व पर्यवेक्षण :**

1. घंटागाडी रिफ्युज कॉम्पॅक्टर इत्यादी दैनंदिन कचरा संकलन व साफसफाई कामकाजाबाबत संबंधित प्रभाग समितीतील स्वच्छता निरीक्षक व मुख्य स्वच्छता निरीक्षक यांच्या स्वाक्षरी घेणे अभिकर्त्यावर बंधनकारक राहील.
2. घंटागाडीची कामाची वेळ सकाळी 7 ते दुपारी 3 वाजेपर्यंत असेल. मध्ये 10 ते 10:30 ही वेळ जेवण व विश्रांतीचे राहील घंटागाडीची वेळ आवश्यकतेनुसार बदलण्याचा अधिकार महापालिकेचा आहे.
3. आम्हीकर्त्यामार्फत पुरवठा करणाऱ्या कामगारांची काम करण्याची वेळ सकाळी 6 ते दुपारी 2 वाजेपर्यंत राहील सदर कामगारांना सकाळी 10 ते 10:30 या दरम्यान जेवण व विश्रांतीसाठी सुट्टी देण्यात येईल. सदर कामाच्या वेळेत आवश्यकतेनुसार बदल करण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहील.

- **कामगारांना पुरवण्यात येणारे साहित्य :**

1. घंटागाडी, कॉम्पॅक्टर इत्यादी वाहनांवर तसेच गटार सफाई काम करणाऱ्या कामगारांना ओळखपत्र, गमबुट, गणवेश, रिफ्लेक्टर जॅकेट, दरमहा हॅण्डग्लोज, हेल्मेट, मास्क व पावसाळ्यात रेनकोट व इतर आवश्यक संरक्षण साहित्य पुरविणे अभिकर्त्यावर बंधनकारक आहे.
2. अभीकरताना कामावर ठेवलेल्या कामगारांचे रजिस्टर अद्यावत करून त्यामध्ये नाव अलीकडील काळातील रंगीत पासपोर्ट साईज फोटो जन्मतारीख व संपूर्ण पत्ता असलेले दस्तऐवजांची माहिती ठेवणे आवश्यक राहील.

- **कराराचा कालावधी :**

1. कंत्राटदाराची निविदा मंजूर झाल्यानंतर कार्यालयीन कामाचे आदेश दिलेल्या तारखेपासून कामाचा कालावधी बारा महिन्यांचा असेल. कंत्राटदाराच्या कामानुसार सदर कालावधीमध्ये वाढ करण्याचा अधिकार आयुक्तांचा असेल.
2. कंत्राटदारास कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव कराराचे कालावधीमध्ये बदल करता येणार नाही.
3. कोणत्याही कारणास्तव कंत्राटदार यांनी घनकचरा संकलन वाहतुकीचे काम कराराचे मुदतीपूर्वी बंद केले अगर सोडून दिले तर अशा प्रसंगी सुरक्षा अनामत जप्त करण्यात येईल.
4. करारातील विहित कालावधीत घनकचरा संकलन व वाहतुकीचे काम अभिकर्त्यांनी बंद केल्यास निविदा व करार रद्द करण्याचा अधिकार माननीय आयुक्त मनपा जालना यांना राहील सदरचे काम अन्य संस्थेकडून करून घ्यावयाचे लागल्यास व त्या पोटी होणाऱ्या नुकसानीची सर्व जबाबदारी कंत्राटदाराचे राहील भरपाई वसूल करण्यासाठी आवश्यकता भासल्यास फौजदारी स्वरूपाची कारवाई व अन्य कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.मग त्याचा कालावधी संपल्यानंतर नवीन निविदा मंजूर होईपर्यंत अभिकर्त्यास पूर्वीच्याच मंजूर दरात संविदेतील अटी शर्तीनुसार काम करणे बंधनकारक राहील.

- **देयक अदायकीसाठी लागणारे दस्तऐवज :**

1. वाहनांचे जीपीएस ट्रेकिंग रिपोर्ट
2. NEFT /RTGS/IMPS द्वारे कामगारांना किमान वेतन व इतर भत्ते अदा केल्याचे बँकेचे अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीचे विवरणपत्र व यादी
3. किमान वेतन कायद्यानुसार मग ते कंत्राटदारातर्फे कामगारांच्या देय असलेले पीएफ ESIC विमा इत्यादी कपात केलेल्या रकमेचे बँकेचे चलनासह कन्फर्मेशन रिसिप्ट व यादी पुरावा.
4. कामगारांची दैनंदिन बायोमेट्रिक पद्धतीने स्वच्छता निरीक्षकाद्वारे प्रमाणित केलेले हजेरी पत्रक

5. शहरातील दैनंदिन निर्माण होणाऱ्या ( ओला व सुका ) कच-याचे स्वच्छता विभाग प्रमुखाद्वारे प्रमाणित केलेल्या वजनाचे रिपोर्ट इत्यादी आवश्यक दस्तऐवज सादर करणे बंधनकारक आहे.
6. वरील सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतरच दरमहा झालेल्या कामाचे देयक शक्यतोवर कार्यालयीन कामकाजाच्या दहा दिवसात अदा करण्यात येईल.
7. घनकचरा बाबत आलेल्या तक्रारींचे निराकरण केल्याचा अहवाल.
8. अभिकर्त्याने घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत केलेल्या दैनंदिन कामाचे पुर्वीचे व नंतरचे जिओ टॅग फोटो अहवाल सोबत जोडणे बंधनकारक राहील.
9. अभिकर्त्याने दैनंदिन कचरा सकंलन करतांना वार्डातील नागरीकांच्या नावासहीत स्वाक्ष-या घेतलेला नोंद वहीमध्ये अद्यावत करुन अहवाल सोबत जोडणे बंधकारक राहिल.
10. अभिकर्त्याने कचरा संकलन केंद्रावर कच-याचे वजन करताना व्हिडिओ रेकॉर्डिंग करुण अहवालासोबत जोडणे बंधनकारक राहील.

- **DISPUTE RESOLUTION**
  1. अभिकर्ता जालना मनपा यांच्यात काही वाद निर्माण झाल्यास यासंबंधी अंतिम निवाडा देण्याचा अधिकार महापालिका आयुक्तांना असेल व यासाठी आरबीट्रेशन अँड कौन्सिलेशन ऍक्ट 1996 च्या तरतुदी लागू राहतील. या कामी मुख्यालय जालना शहर हे राहील.

- **न्यायालयीन कार्यक्षेत्र :**
  1. अभिकर्ता व महानगरपालिका यांच्यामध्ये वरील संविधान बाबत किंवा मजूर मक्त्याबाबत कोणताही कायदेशीर वाद उद्भवल्यास त्याबाबत दाद मागण्याकरिता न्यायालयीन कार्यक्षेत्र जिल्हा सत्र न्यायालय जालना राहील. तसेच मे उच्च न्यायालयासाठी औरंगाबाद खंडपीठ हे क्षेत्र राहील.

- अन्य तरतुदी :

1. शहरातील कचरा संकलन आणि वाहतूक कामात सतत अनियमितता आढळून आल्यास आणि वारंवार सूचना देऊन सुद्धा कामात सुधारणा होत नसल्याचे दिसून आल्यास पूर्व नोटीस देऊन संपूर्ण अनामत रक्कम किंवा बँक गॅरंटी जप्त करून मक्ता रद्द करण्यात येईल.
2. अभीकर्त्याने नेमलेले कामगार व वाहन चालक हे महानगरपालिकेचे कामगार म्हणून हक्क सांगणार नाहीत व त्यांना मनपा सेवेत सामावून घेतले जाणार नाही त्यांना व त्यांच्या नातेवाईकांना किंवा कुटुंबीयांना हक्क सांगता येणार नाही अथवा कोणत्याही प्रकारचा आर्थिक मोबदला दिला जाणार नाही.
3. कंत्राटदारामार्फत कामगारांना दरमहा दहा तारखेपूर्वी किमान वेतन कायद्याप्रमाणे देय वेतन देण्याची जबाबदारी अभिकर्त्यावर राहील.
4. करारानंतर होणारा मान्य पत्रव्यवहार तसेच जालना महानगरपालिकेकडून वेळोवेळी दिले जाणारे आदेश सूचना कराराचा भाग समजण्यात येतील.
5. कोणत्याही परिस्थितीत व कारणासाठी या कराराने प्राप्त झालेले हक्क अधिकार माननीय आयुक्त जालना महानगरपालिकेचे राहतील. लेखी पूर्व परवानगी शिवाय अन्य कोणीही व्यक्ती संस्थेस लिहून देता येणार नाही अथवा प्रदान करता येणार नाहीत अथवा हस्तांतर करता येणार नाहीत.
6. अभिकर्त्यांनी करारातील कोणत्याही अटी शर्तीचा भंग केल्यास त्यांना कायदेशीर नोटीस देऊन खुलासा प्राप्त करून खुलासा समाधानकारक नसल्यास अभिकर्ता विरुद्ध नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याचा अधिकार माननीय आयुक्त जालना महानगरपालिका यांना राहील.
7. घनकचरा संकलन बाबत महानगरपालिका वेळोवेळी निर्देश देईल त्याची अंमलबजावणी करणे अधिकार त्यावर बंधनकारक राहील तसेच अभिकर त्याला उपरोक्त कामाचा पोट ठेका देता येणार नाही अथवा पोट ठेकेदार नेमता येणार नाही.
8. शासकीय लेखापरीक्षणात काही आक्षेप निघाल्यास त्याचे निराकरण करणे अथवा रिकव्हरी रक्कम भरणे अभिकर्त्यास बंधनकारक राहील.
9. घनकचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने अधिकच्या अटी शर्तीच्या करारनाम्यात समाविष्ट करण्याचे अधिकार माननीय आयुक्त यांनी राखीव ठेवलेले असून त्या अटी शर्ती अभिकर्त्यास बंधनकारक राहते.

- **कामगार कायदा विषयी तरतूद**

1. भविष्य निर्वाह निधी कायदा बोनस ॲॅक्ट ग्रॅच्युईटी ॲक्ट (ESIC) किमान वेतन कामगार कायद्याचे अन्वये देय असलेल्या देयकाची रक्कम कामगारांना देणे अभिकर्त्यास बंधनकारक राहील. तसेच कामगारांच्या वेतना वेळी वेळोवेळी होणारी वाढ व त्यावरील उपरोक्त लेव्ही (Levy) ची रक्कम नुसार तसेच अन्य प्रचलित कायद्याचे काटेकोरपणे पालन करण्याचे जबाबदारी अभिकर्त्यांवर राहील.
2. अभिकर्ता यांनी कामावर नेमलेल्या कामगारांना मनपा आस्थापनेवर घेण्यासाठी कोणताही हक्क राहणार नाही मनपातील सेवे बाबत त्यांना कोणताही हक्क सांगता येणार नाही.
3. घनकचरा संकलन व वाहतुकीचे काम करताना काही आणि अपघात इत्यादी होऊन कामगारांची जीवित व वित्त हानी झाल्यास त्याचे भरपाई करण्याची जबाबदारी अभी कर्त्यांवर राहील.
4. अभीकर्त्याने कंत्राटी कामगारांचा विमा शासकीय विमा निधी कार्यालयाकडे उतरविणे अनिवार्य आहे त्याचा पुरावा सादर न केल्यास एकूण विमा रकमेच्या कंत्राटी देय रकमेतून एक टक्का रक्कम पहिल्या बिलातून कपात केली जाईल.
5. अभीकर्त्याने नेमलेल्या कामगारांचा पगार रजा व इतर सवलती इत्यादी बाबींची सर्व जबाबदारी कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट 1970 व कॉन्टॅक्ट लेबर नियम 1971 अन्वये अभीकर्त्याची राहील तसेच कामगार आयुक्त कार्यालयाचे आवश्यकतेप्रमाणे स्वखर्चाने घेण्याची जबाबदारी अभिकर्त्यावर राहील.
6. किमान वेतन कायदा 1948 च्या नियमानुसार कर्मचाऱ्यांचे वेतन कामगारांच्या बँक खात्यात जमा करणे बंधनकारक राहील तसेच दर महिन्याच्या मासिक देयकासोबत कामगारांना अदा केलेल्या वेतनाची यादी व बँकेचे चलन जोडणे अभिकर्त्यावर बंधनकारक राहील.
7. अभीकर्त्याचे निविदा मंजूर झाल्यानंतर प्रोफेशनल टॅक्स सर्टिफिकेट पीएफ पीएसआयसी व इतर आवश्यक प्रचलित शासकीय नियमानुसार वेळोवेळी घ्यावे लागणारी नोंदणी प्रमाणपत्र परवाने संबंधित कार्यालयाकडून स्वखर्चाने घ्यावे लागतील. किंवा अनुज्ञप्ती घेऊन त्याची पूर्तता करणे बंधनकारक राहील.
8. अभीकर्त्यास बालमजुरांना कामावर ठेवता येणार नाही. याकरिता कामगारांचे जन्मतारखेचा पुरावा घेणे बंधनकारक राहील. द चाइल्ड लेबर ॲॅट 1986 नुसार बालमजूर कामावर आढळून आल्यास कायदेशीर कारवाईस अभिकर्ता पात्र राहील.
9. अभीकर्त्याने कामगार लावताना त्याचे वय 18 वर्षापेक्षा कमी व साठ वर्षापेक्षा जास्त नसावे व शारीरिक व मानसिक दृष्ट्या जड काम करण्यासाठी सक्षम असावा तसेच कामगारांचे वेळोवेळी प्रमुख वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून तपासणी करून घेणे बंधनकारक राहील.
10. भविष्य निर्वाह निधी रक्कम ई एस आय सी ची रक्कम दरमहा भरणा केल्याचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.
11. कामगारांना राष्ट्रीय चार सण (प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, कामगार दिन व महात्मा गांधी जयंती) या दिवसांचे भर पगारी सुट्टी देणे अभिकर्त्यास बंधनकारक राहील.
12. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या कामगारांना कामावर ठेवता येणार नाही. त्याबाबतची अभिकर्तने परस्पर पोलिसांकडून कामगारांची पार्श्वभूमीची पडताळणी करून घेणे आवश्यक राहील.

**दंडाची तरतूद :**

- नैसर्गिक आपत्ती उदाहरणार्थ महापूर भूकंप तसेच सार्वजनिक बंद व कामगारांचे राज्य व राष्ट्रव्यापी संप इत्यादी कारणांमुळे काम बंद राहिल्यास कंत्राटदारास दंड आकारला जाणार नाही मात्र कंत्राटदाराचे अकार्यक्षमता अथवा बेजबाबदारपणामुळे तसेच कामगारांच्या व कंत्राट दारामध्ये काही वाद निर्माण होऊन कामगारांनी संप करून काम बंद केल्यास दंड आकारला जाईल. सदर बंद कालावधीत महानगरपालिकेने पर्याय व्यवस्था केल्यामुळे ज्यादा खर्च करावा लागल्यास सदरचा खर्च अभिकर्त्याच्या मासिक देयकांमधून वसूल करण्यात येईल. तसेच कामगारांनी केलेल्या संपा करीता कंत्राटदार जबाबदार आहे किंवा कसे हे ठरविण्याचा अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना असेल.

- प्रभागांमध्ये सकाळी सात वाजता घंटागाडी व इतर आवश्यक वाहने पाठविणे आवश्यक असून प्रभागात निर्धारित वेळेत घंटागाडी पाठविण्यात कसूर केल्यास पर्यायी वाहना अभावी काम बंद राहिल्यास चार चाकी घंटागाडी करिता प्रतिदिन प्रतिवाहन रुपये 3000 दंड आकारण्यात येईल. तसेच रिफ्युज कॉम्पॅक्टरला प्रतिदिन प्रतिवाहन 5000 व लोडरला प्रतिदिन प्रतिवाहन 2000 दंड आकारण्यात येईल व सदर रक्कम देयकातून कपात करण्यात येईल. दंडाची रक्कम देयका पेक्षा जास्त असल्यास अभि करते असतो जालना महापालिकेस भरावा लागेल.
- घटागाडी रिफ्युज कॉम्पॅक्टर लोडर इत्यादी वाहनांवर तसेच गटार सफाई करिता कामगार पुरवठा न केल्यास प्रति कामगार प्रति दिन रुपये 1000 दडा करण्यात येईल.
- अभीकर्त्याने कामगारांना गणवेश व गम बूट. hand gloves व मास्क पावसाळ्यात रेनकोट इत्यादी आवश्यक साहित्य वेळोवेळी देणे बंधनकारक राहील अन्यथा प्रती कामगार रुपये 100 याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.
- वाहनांवर लावण्यात आलेले वेहिकल ट्रेकिंग सिस्टीम बंद ठेवल्यास प्रतिदिन प्रतिवाहन रुपये 500 चा दंड वसूल करण्यात येईल.
- अभिकर्ता यांनी त्यांच्या वाहनाने संकलित केलेल्या कचऱ्यामध्ये माती गाळ दगड मिश्रित कचरा आढळून आल्यास रुपये 5000 प्रति वाहन याप्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल.
- घंटागाडी वाहनाने निश्चित केलेल्या फेरीमधील गल्ली सोडल्यास प्रति गल्ली 500 रुपये दंड आकारणी देईल.
- दैनंदिन कामकाजाच्या वेळेत कचरा कंटेनरच्या इतरत्र उघड्यावर कचरा पडलेला आढळून आल्यास रुपये 500 प्रति ठिकाण दंड लावण्यात येईल.
- ओला व सुका कचरा वेगवेगळ्या संकलन न केल्यास रुपये दोन हजार प्रति घंटागाडी दंड करण्यात येईल.
- घंटागाडी नेमून दिलेल्या रूट नुसार कचरा संकलन केल्यास त्या प्रती रूट रुपये 1000 दंड आकारण्यात येईल. तसेच वाहतूक करताना बंदिस्त अथवा ताडपत्रीचे अच्छादन घालून कचऱ्याचे वाहतूक केल्याचे आढळून आल्यास रुपये 1000 प्रति वाहन दंड आकारण्यात येईल.
- मनपा ने ठरवून दिलेल्या ट्रान्सफर कलेक्शन सेंटर व्यतिरिक्त इतर ठिकाणी कचरा टाकल्यास 1000 प्रती ठिकाण दंड आकारण्यात येईल.
- सर्व विभागात दैनंदिन कचरा संबंधी आलेल्या तक्रारी 12 तासात निवारण करणे बंधनकारक राहील सदर मुदतीत निवारण न झाल्यास प्रति तक्रार रुपये 500 दंड आकारण्यात येईल.
- अभीकर्त्यांनी दैनंदिन कचरा गोळा करून वाहतूक करताना कोणत्याही प्रकारच्या कचरा जळताना आढळल्यास रुपये 1000 प्रति ठिकाण याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.
- कामगारांची दैनंदिन हजेरी बायोमेट्रिक किंवा जीपीएस सेल्फी पद्धतीने घेणे बंधनकारक राहील तसे व्यवस्था न केल्यास प्रति दिवस 2000 दंड आकारण्यात येईल.
- अभिकर्त्याने दैनंदिन साफसफाई चे काम एखादी गल्ली किंवा बोळातील नालेसफाईचे काम केले नसल्याचे निदर्शनास आल्यास प्रति गल्ली शंभर रुपये दंड आकारण्यात येईल.
- अभिकर्त्याने दैनंदिन गटर सफाई कामं करिता मजूर पुरवठा करते मजूर संख्या मध्ये कमी पुरवठा केल्यास प्रति गैरहजर मजूर 1000 दंड करण्यात येईल.
- जनजागृती पर संदेश व स्लोगन प्रसारित करणाऱ्या घंटागाडीवरील ॲम्प्लिफायर व स्पीकर बंद पडल्यास किंवा बिघाड झाल्यास त्याच दिवशी दुरुस्त करून लावणे आवश्यक राहील अन्यथा प्रतिदिन 500 प्रति वाहन दंड करण्यात येईल.
- दैनंदिन दंडाची रक्कम मासिक देयकाचे दोन टक्के पेक्षा जास्त असल्यास मनपातर्फे नोटीस देऊन सात दिवसात खुलासा मागविण्यात येईल.
- दंडाच्या रकमेत सतत तीन महिन्यापर्यंत सुधारणा न झाल्यास दंडाच्या रकमेत दुप्पट वाढ करण्यात येईल.

- अतिम नोटीस देऊन सुद्धा मक्तेदाराच्या कामकाजात सुधारणा दिसून न आल्यास अनामत रक्कम जप्त करून मग ता रद्द करणे तसेच काळे यादीत समावेश करणे बाबतचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार आयुक्त जालना महानगरपालिका यांचा राहील व उर्वरित कालावधीसाठी अभिकर्त्याच्या जोखीम व हमीवर काम करून घेण्यात येईल व त्या पोटी येणारा वाढीव खर्च मक्तेदाराकडून वसूल करण्यात येईल.
- शहरातील कचरा संकलनाची सर्व यंत्रणा सुरळीत होण्यासाठी तीन महिन्याचा कालावधी पंतप्रधान देण्यात येईल मात्र त्यानंतरकरांना मधील अटी शर्तीनुसार दंडाच्या आकारणी सुरू होईल.

जालना महानगरपालिका यांची जबाबदारी:

- कॉम्पॅक्टर, टिप्पर व JCB साठी लागणारे सहकर्मचारी किंवा हेल्पर जालना महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करून दिले जातील.
- शहरातील गटार माल उचलन्यासाठी ठेकरारादला मालकीचे किंवा भाडेतत्वावर ट्रॅक्टर व चालक उपलब्ध कारायचे आहे.
- जालना महानगरपालिकेकडून पार्किंगची जागा उपलब्ध करून दिली जाईल आणि त्यामध्ये वीज, पाणी व कंपाऊंड इत्यादींची व्यवस्था असेल त्या पार्किंगसाठी वीजपुरवठा व पाण्याचे कनेक्शन दिले जाईल व त्याचे मासिक बिल ठेकेदाराला भरणे बंधनकारक आहे.
- जालना महानगरपालिके कडून कचरा डेपो / डम्पिंग ग्राउंड वरती चालू स्थिती मध्ये वजन काटा व वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यात येईल.
- जालना महानगरपालिका दैनंदिन कचरा टाकण्यासाठी डम्पिंग ग्राऊंडवर जागा उपलब्ध करून देण्यात येईल.
- जालना महानगरपालिका ट्रान्सफर स्टेशनमधून सध्याचा कचरा उचलून ती जागा दैनंदिन कचरा ट्रान्सफर करण्यासाठी रिकामी करून देण्यात येईल.
- येत्या 02 महिन्यांच्या कालावधीत जालना महानगरपालिका कडून नवीन 10 घंटागड्यांची व्यवस्था करण्यात येईल.
- घंटागडी, टिपर आणि कॉम्पॅक्टर यांसारखी सर्व वाहने कंत्राटदाराकडे चालू स्थितीत सुपूर्द केली जातील.
- जालना महानगरपालिका वाहनांसाठी लागणारे टूल किट, वेल्डिंग मशीन, वेहिकले वॉशिंग युनिट आणि स्टेपनीची व्यवस्था करेल.
- नाल्याच्या साफसफाईसाठी 50 मजूर जालना महानगरपालिकेकडून दिले जातील आणि 50 मजूर कत्राटदारामार्फत तैनात केले जावेत.
- गाड्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी लागणारे कारागीर व मदतनीस यांना आयटीआय अप्रेंटिसशिपवर मधून नियुक्त करण्याची मुभा आहे व त्यासाठी जालना महानगरपालिका मदत करेल.
- जालना महानगरपालिका कडून गाड्याच्या ट्रॅकिंगसाठी लागणारी स्क्रीन व तीन कॉम्पुटर उपलब्ध करून देण्यात येईल.
- कॉल सेंटरची उभारणी, पार्किंगची पायाभूत सुविधा आणि इतर भांडवली खर्च, या सर्वांची व्यवस्था हि ठेकेदाराने लिखित स्वरूपात दिल्यानंतर ती जालना महानगरपालिका कडून करण्यात येईल.
- जालना महानगरपालिके कडून जे वाहने ठेकेदाराला पुरवण्यात येणार आहेत त्याचे भाडे आकारण्यात येणार नाही. पार्किंगच्या पायाभूत सुविधा जसे की (शेड, वाहन धुलाई केंद्र, देखभाल टूल किट, एअर कंप्रेसर, एअर गन, ग्रिस पंप, वेल्डिंग मशीन, टायर पंचर टूल किट, स्टेपनीची आणि साहित्य साठवण्यासाठी केबिन) जालना महानगरपालिकेकडून उपलब्ध करून दिल्या जातील.
- कॉल सेंटरसाठी आवश्यक पायाभूत सुविधा (टेबल, खुर्ची, संगणक, टोल फ्री क्रमांक, वाहनांवर टोल फ्री क्रमांक लावणे इत्यादी) जालना महानगरपालिकेकडून पुरवण्यात येतील.
- रस्ते साफसफाई करणे हि ठेकेदाराची जबाबदारी नाही.

**निविदा पडताळणी :**

तांत्रिक निविदा पडताळणी

1. निविदेमध्ये पात्र होण्यासाठी तांत्रिक लिफाफा क्रमांक एक मधील तांत्रिक दस्तऐवजाचा वरीलप्रमाणे नमुद केल्यानुसार पूर्तता करीत असतील त्या निविदाकारांचे आर्थिक लिफाफा क्रमांक दोन उघडण्यात येतील.

वित्तीय बोलीची पडताळणी :

1. तांत्रिक पडताळणीमध्ये पात्र निविदा धारकांमधुन योग्य निविदा धारकांची निविड करण्यासाठी QCBS पध्दतीचा अवलंब केला जाईल सदर पध्दतीसाठी आवश्यक पात्रता व त्यासाठी असणारे गुण सोबत जोडण्यात आले आहे. QCBS पडतळणामध्ये 100 पैकी किमान 70 गुण मिळविणा-या निविदाधारकांचे वित्तीय लिफाफे उघडण्यात येतील आणि त्यांच्या वित्तीय बोलीच्या आधारे निविदाधारक अंतिम केला जाईल.

**वरील अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या मला पूर्णपणे बंधनकारक व मान्य असुन त्याबद्दल मी खाली सही केली आहे.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **स्वच्छता विभाग प्रमुख** | **सहायक आयुक्त** | **उपायुक्त** | **मुख्य लेखाअधिकारी** | **आयुक्त** |
| जालना शहर | जालना शहर | जालना शहर | जालना शहर | जालना शहर |
| महानगरपालिका | महानगरपालिका | महानगरपालिका | महानगरपालिका | महानगरपालिका |

जालना शहर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागासाठी
घनकचरा व्यवस्थापन करणेकरिता सदर निविदा ऑनलाईन स्वरुपात सादर करण्यापुर्वी खालीलप्रमाणे दोन लिफाफा पध्दतीने निविदा दाखल कराव्यात

इ) लिफाफाक्र.01 (आवश्यक कागदपत्रे)

ई) टिप – लिफाफा क्र.01 मध्ये खालील आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

| अ.क्र | कागदपत्राचे/प्रमाणपत्रांचे विवरण |
|---|---|
| 1 | इसारा रक्कम निविदाधारकाच्या खात्यामधुन ऑनलाईन पदधतीने भरणा केल्यानंतर प्राप्त होणारी पावती |
| 2 | कपनीचे (कंपनीचे नोंदणी प्रमाणपत्र) संस्थेचे (संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र) / कंत्राटदारचे शॉप ऍक्ट लायसन्स |
| 3 | मागील तिन वषाची जीएसटी प्रमाणपत्र व जीएसटी भरणा केल्याबाबत ची चलने. |
| 4 | अनुभव प्रमाणपत्रे मागील तिन वर्षात किमान 1 महानगरपालिका किंवा 1 "अ" वर्ग नगरपरिषद (2 लाख पेक्षा जास्त असलेली लोकसंख्या) त्यामध्ये<br>4. निविदा रक्कमेच्या 80 % इतके रक्कमेचे किमान 1 काम असणे आवश्यक आहे.<br>5. निविदा रक्कमेच्या 50 % इतके रक्कमेचे किमान 2 कामे असणे आवश्यक आहे.<br>6. निविदा रक्कमेच्या 40 % इतके रक्कमेचे किमान 3 कामे असणे आवश्यक आहे.<br>(कामाचे आदेश ग्राह्य धरले जाणार नाही, अनुभव प्रमाणपत्र बंधनकारक राहील.) |
| 5 | अद्यावत लेबर लायसन्स. |
| 6 | शासकिय/ स्थानिक स्वराज्य संस्था/ महानगरपालिकेत घनकचरा व्यवस्थापनासाठी अभिकर्ताचे आस्थापनेवर घरगुती कचरा संकलन/रस्ते/गटार/व्यापारी संकुले इ. साफ सफाई करणे कामी कामाच्या अनुभवासाठी असल्याचा मागील 3 वर्षामधील किमान 1 वर्षाचे किमान 200 कामगार पुरवठा समाधानकारक काम करीत असल्याचा सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र. |
| 7 | निविदाधारकास नालेसफाईचा अनुभव हवा (मागील 3 वर्षात किमान 1 वर्ष) |
| 8 | महाराष्ट्र कामगार कल्याण निधी नोंदणी प्रमाणपत्र व भरणा केलेबाबतची चलने. |
| 9 | अभिकत्याचे **(Net Worth)** आर्थिक पत रु. 05 कोटी पेक्षा कमी नसल्याचे सनदी लेखापालाचे / चार्टर्ड अकाऊंटंटचे UDIN क्रमांकासह असलेले प्रमाणपत्र. |
| 10 | भविष्य निर्वाह निधी (EPF)कायद्यांतर्गत विभागाकडे नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र व मागील तिन महिण्याचे कामगारांचे ईपीएफ भरणा केल्याबाबतची चलने व कंत्राटदाराने Employees State Insurance Corporation (ESIC) मागील तिन महिण्याचे चलने टेंडर सादर करतेवेळी ऑनलाईन अपलोड करणे बंधनकारक राहील. |
| 11 | निविदाधारक हा किमान मागील 3 वर्षापासून नफ्यामध्ये असावा. |
| 12 | निविदाधारकाकडे स्वतःच्या मालकीचे किमान 3 Refuse Compactor असावेत. (आर.सी.बुक ची झेरॉक्स प्रत पुरावा म्हणून जोडण्यात यावी.) |
| 13 | अभिकर्त्याचे नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियमानुसार स्वतःच्या मालकीची 20 वाहने असल्याचा पुरावा. उदा. परिवहन कार्यालयाकडील नोंदणी/ आर.सी. बुक्स. |
| 14 | कंत्राटच्या कालावधीत कंत्राटी कर्मचा-यांचा पगार दर महिन्याच्या 10 तारखेपर्यत देण्याबाबत रु. 500/- चे स्टॅम्प पेपरावर शपथपत्र. |
| 15 | अभिकर्तावर कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा दाखल नसल्याबाबतचे व काळ्या यादीत समावेश नसल्याबाबत रु. 500/- चे स्टॅम्प पेपरावर शपथपत्र. |
| 16 | निविदेतील तांत्रिक लिफाफातील अटी शर्ती व्यतिरीक्त निविदेतील इतर सर्व अटी शर्ती मान्य असल्याचे प्रमाणपत्र. |
| 17 | निविदामधील पदाधीकारी/कर्मचारी यांचा सहभाग नसले बाबतचे रु. 500/- च्या स्टॅप पेपरवर प्रतिज्ञापत्र |
| 18 | पॅन कार्ड, |
| 19 | नोंदणी प्रमाणपत्र |

| | |
|---|---|
| 20 | professional Tax Registration प्रमाणपत्र व भरणा केलेबाबतची चलने. |
| 21 | राष्ट्रीयकृत/ शेड्युल्ड बँकेची Bank Solvency 4 कोटी. |
| 22 | Minimum Average Turnover of last 3 year at least Rs. 10 कोटी. Certified by CA with UDIN. |
| 23 | **मागील ५ वर्षातील पूर्ण झालेली कामे (Work Done) आणि सध्या सुरू असलेली कामे (Work in hand):** संबंधित विभागाच्या (शासकीय/निमशासकीय) सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| 24 | **सध्या सुरू असलेल्या कामांचे प्रमाणपत्र:** यासोबत संबंधित विभागाचे 'वर्क ऑर्डर' **(Work Order)** जोडणे अनिवार्य आहे. तसेच, सर्व विभागांतील सुरू असलेल्या कामांचा सारांश कंत्राटदाराच्या **(Bidder)** लेटरहेडवर देणे आवश्यक आहे. |
| 25 | **निविदा क्षमता (Bid Capacity):** निविदा प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासूनचे निविदा क्षमता प्रमाणपत्र (**Chartered Accountant** कडून **UDIN** क्रमांकासह प्रमाणित) असणे आवश्यक आहे. |
| 26 | **यंत्रसामग्री आणि तांत्रिक कर्मचारी:** आवश्यक यंत्रसामग्री आणि तांत्रिक व्यक्तींच्या तपशिलांच्या प्रमाणित प्रती सादर कराव्यात. |
| 27 | **किमान वेतन कायदा:** महाराष्ट्र किमान वेतन कायद्यातील तरतुदींनुसार कामगारांना किमान वेतन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असेल. |
| 28 | **गुंतवणूक हमीपत्र:** कंत्राटाच्या एकूण मूल्याच्या किमान २५% रक्कम कामाच्या अंमलबजावणी दरम्यान गुंतवण्याची क्षमता असल्याचे हमीपत्र कंत्राटदाराने देणे आवश्यक आहे. |
| 29 | **टर्नओव्हर (Turnover) प्रमाणपत्र:** मागील ५ आर्थिक वर्षांचे टर्नओव्हर प्रमाणपत्र सनदी लेखापालाद्वारे (**C.A. with UDIN**) प्रमाणित असावे. |
| 30 | **पूर्व-निविदा बैठक (Pre-Bid Meeting):** आयुक्त कार्यालय, जालना महानगरपालिका येथे दिनांक **14/05/2026** रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केली जाईल. |
| 31 | **न्यायालयीन खटल्यांची माहिती:** कंत्राटदार सहभागी असलेल्या मागील ३ वर्षांतील किंवा सध्या सुरू असलेल्या कोणत्याही न्यायालयीन वादाची **(Litigation)**, संबंधित पक्ष आणि विवादित रकमेची माहिती द्यावी. |
| 32 | **प्रतिज्ञापत्रे (Affidavits):** सर्व प्रतिज्ञापत्रे निविदा प्रसिद्ध झाल्याच्या कालावधीतील असावीत. |
| 33 | **EMD पावती:** १% इसारा रक्कम (**EMD**) भरल्याच्या पावतीसोबत कंत्राटदाराच्या बँक खात्याचा तपशील किंवा स्टेटमेंट जोडणे आवश्यक आहे. |
| 34 | **समान कामाचा अनुभव:** मागील ३ वर्षांत केलेल्या अशाच प्रकारच्या कामांची माहिती कंत्राटदाराच्या लेटरहेडवर (स्वाक्षरी आणि शिक्क्यासह) द्यावी. (**CVC** मार्गदर्शक तत्त्वे लागू राहतील). |
| 35 | **सादर केलेल्या निविदांची यादी:** इतर विविध विभागांत ज्या कामांसाठी निविदा आधीच सादर केल्या आहेत, अशा कामांची प्रमाणित यादी. |
| 36 | **आयकर परतावा (ITR):** मागील ५ आर्थिक वर्षांचे आयकर परतावे. सनदी लेखापालाने प्रमाणित केलेल्या आर्थिक विवरणांच्या (**Financial Statements**) प्रतींवर कंत्राटदाराची स्वाक्षरी आणि 'रिटर्न भरल्याची पावती' (**Acknowledgement**) असणे आवश्यक आहे. |
| 37 | ई-निविदा प्रसिद्धीचा कालावधी हा 15 दिवसांचा असेल. |
| 38 | निविदेतील तांत्रिक अटी अ.क्र. 1 ते 37 अभिकर्त्याचे लेटरहेडवर टंकलिखित करुन सोबत जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांचा पान क्रमाक नमुद करुन गोषवारा स्वाक्षरीसह लिफाफा क्र. 1 मध्ये ऑनलाईन ई-निविदेत सादर करणे बंधनकारक राहील. |

वर नमुद केलेली तांत्रिक माहिती व त्याबाबतच्या मुळ प्रमाण पत्राच्या छायांकित प्रती सदरच्या निविदामध्ये ऑनलाईन सादर केली नसेल,तर निविदा ग्राहय धरली जाणार नाही.

उपायुक्त,
**जालना शहर महानगरपालिका,जालना.**

Marking criteria and selection method (निविदाधारकाची निवड QCBS पध्दतीने होईल)

| S. No. | Specific experience of the bidder firm | M.M (100) | Document Proof |
|---|---|---|---|
| A | **Experience for Door to Door Collection and Transportation of Municipal Solid Waste up to dumping ground in a single contract in last 03 years continuous period of 01 years** | **20 Marks** | Client experience certificate along with Work Order / Contract copy. |
| 1 | Single project with value ₹ 13.82 Crore to 20 Crore | 10 Marks | |
| 2 | Single project with value above ₹ 20 Crore to 25 Crore | 15 Marks | |
| 3 | Single project with value more than ₹ 25 Crore | 20 Marks | |
| B | **Bidder should have Experience for providing minimum 200 labours for Solid Waste Management work minimum 01 years in the last 03 years.** | **10 Marks** | Client experience certificate along with Work Order / Contract copy. |
| 1 | 200 to 250 Labours | 5 Marks | |
| 2 | 251 to 300 Labours | 7.5 Marks | |
| 3 | 301 and above labours | 10 Marks | |
| C | **Experience for solid waste management work in Devotee Place or Hill Station or Tourist Place one year in any years** | **10 Marks** | Client experience certificate along with Work Order / Contract copy. |
| 1 | Experience in 01 place | 5 Marks | |
| 2 | Experience in 02 and more places | 10 Marks | |
| D | **The Bidder shall have a minimum average annual turnover of ₹ 4 Crore during the last three (3) consecutive financial years, i.e., FY 2022–23, FY 2023–24, and FY 2024–25. (As per the CA statement)** | **10 Marks** | Average Annual Turnover statement certified from CA with UDIN No. and Balance Sheet |
| 1 | Above ₹ 10 Cr. – below or equal to ₹ 15 Cr. | 5 Marks | |
| 2 | Above ₹ 15 Cr. – below or equal to ₹ 20 Cr. | 7.5 Marks | |
| 3 | Above ₹ 20 Cr. | 10 Marks | |
| E | **The Bidder shall have ₹ 3 Crore Net Worth in each of the last three (3) consecutive financial years, i.e., FY 2022–23, FY 2023–24, and FY 2024–25. (As per the CA statement)** | **10 Marks** | Average Annual Turnover statement certified from CA with UDIN No. and Balance Sheet |
| 1 | Above ₹ 5 Cr. – below or equal to₹ 6 Cr. | 5 Marks | |
| 2 | Above ₹ 6 Cr. – below or equal to ₹ 7 Cr. | 7.5 Marks | |
| 3 | Above ₹ 7 Cr. | 10 Marks | |
| F | **The Bidder shall submit a Bank Solvency Certificate of minimum ₹2 Crore issued by a Nationalized Bank or Scheduled Commercial Bank.** | **5 Marks** | Bank Solvency certificate which is not more than 06 month old |
| 1 | Above ₹ 4 Cr. – below or equal to ₹ 5 Cr. | 2 Marks | |
| 2 | Above ₹ 5 Cr. – below or equal to ₹ 6 Cr. | 3 Marks | |
| 3 | Above ₹ 6 Cr. | 5 Marks | |
| G | **The Bidder must ensure that at least 20 nos. of Hydraulic system vehicle being registered within last 08 years in the name of firm. Registration Certificate (R.C Book) of each vehicle must be provided as proof of ownership.** | **5 Marks** | Registration Certificate |
| 1 | Above 20 below or equal to 30 vehicles | 2 Marks | |
| 2 | Above 30 below or equal to 40 vehicles | 3 Marks | |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | Above 40 vehicles | 5 Marks | |
| H | **Detailed Proposed Methodology by the Bidder for the Execution of the Project** | **30 marks** | Approach and Methodologywith elaborate plan on eachfactor.<br><br>Bidder shall give the Presentation in front of the committee when Authority Demands to Bidder |
| | The proposal should have the following components(not exhaustive): | | |
| 1 | Technical profile of the company | 5 | |
| 2 | Understanding of the Scope of Work | 5 | |
| 3 | Proposed methodology of bidder for undertaking the assignment<br>a) Work Plan<br>b) Understanding of TOR<br>c) List of equipment<br>d) Disaster Management Plan/Emergency & contingencies<br>e) Plan for IEC activity<br>f) Implementation of complaint handling cell | 15 | |
| 4 | Monitoring and Execution plan | 5 | |
| | **The price bids of only those bidders who qualify technically (above 70 marks) will be considered for financial evaluation.** | **Total 100 Marks** | |

Envelope No 2 (Financial Bid)

**"Financial Bid"** The Financial Proposal shall consist of rate quoted by the bidder in the predefined format **(BOQ)** herein referred to as **"above or below"**. Financial bid has to be quoted online only.

The financial bids of the Technically Qualified Bidders with lowest financial quote (i.e. L1 bidder as per FINANCIAL OFFER, total of A+B+C) shall be considered as the lowest Financial proposal (FM) and will be given a financial score (SF) of 100 points. The financial scores of other proposals will be computed as follows:

- SF= 100 x FM/F (F= amount of financial proposal)
- Proposals will finally be ranked according to their combined technical
- (ST) and financial (SF) scores as follows:
- S= ST x Tw + SF x Fw

Where S is the combined score, and Tw and Fw are weights assigned to Technical Proposal and Financial Proposal that shall be 0.70 and 0.30 respectively.

The first ranked bidder having the combined technical (ST) and financial (SF) scores shall be selected for negotiation (the "Selected Applicant") while the second ranked Applicant will be kept in reserve.

The selected bidder shall be the first Ranked Applicant (H-1, having the highest combined score).

उपायुक्त,
जालना शहर महानगरपालिका,जालना.

Signature Not Verified
Digitally signed by Raja Uddhavrao Bagale
Date: 2026.05.08 15:42:15 IST
Location: Maharashtra-MH